08 AUG 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# स्वयंअध्ययन साहित्य लेखन परंपरा सर्वोत्तम

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : राज्यशास्त्राच्या स्वयंअध्ययन साहित्याचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांमधील स्वयंअध्ययन साहित्य लेखनाची परंपरा सर्वोत्तम असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुधारित झालेल्या अभ्यासक्रमांप्रमाणे बी.ए.-भाग २ राज्यशास्त्र स्वयंअध्ययन साहित्याचा प्रकाशन सोहळा व्यवस्थापन परिषद सभागृहात झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. ज्योती जाधव, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. रवींद्र भणगे, केंद्राचे समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सचिन भोसले, योगेश पवार, विकास पाटील उपस्थित होते. केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे यांनी आभार मानले.

सकाळ



**कोल्हापूर :** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघातील खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे.

# सॉफ्टबॉल स्पर्धेतील विजेत्या संघाचा सत्कार

कोल्हापूर, ता. ७ : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघातील खेळाडूंचा आज सत्कार करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार झाला. विक्रम सिंहापुरी विद्यापीठ (नेल्लूर, आंध्र प्रदेश) येथे स्पर्धा झाली.

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने अंतिम सामन्यात पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचा अटीतटीच्या सामन्यात २ विरुद्ध १ होमरन्सच्या फरकाने पराभव केला. महिला संघाने सलग १० सामने जिंकून विजेतेपदाला गवसणी घातली. महिला सॉफ्टबॉलच्या इतिहासात विद्यापीठाला प्रथमच सुवर्णपदक मिळाले.

विजयी संघात कर्णधार स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पुरी, करिश्मा कुडचे, अंजली पवार, साक्षी येताळे, मृणाली जाधव, वैष्णवी हुळहुळे, सृष्टी शिंदे, सौशज्ञ माने, सागरिका म्हातो, सलोनी नलवडे, सृष्टी कदम, अनुजा पाटील, श्रावणी चौगुले, निलोफर गोस, सृष्टी देशमुख यांचा समावेश होता.

प्रशिक्षक म्हणून प्रा. विनायक जाधव, व्यवस्थापक म्हणून डॉ. राम पवार यांनी काम पाहिले. सत्कारप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, माजी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय विजेता महिला सॉफ्टबॉल संघ. (छाया : अर्जुन टाकळकर)

# राष्ट्रीय सुवर्णविजेत्या महिला संघाचे शिवाजी विद्यापीठात स्वागत

**कोल्हापूर:** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आला.

विक्रम सिंहापुरी विद्यापीठ, नेल्लूर (आंध्र प्रदेश) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत विद्यापीठाच्या महिला संघाने अंतिम सामन्यात पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीविरुद्ध २-१ होमरन्सच्या फरकाने सामना जिंकून सुवर्णपदक मिळविले. संघाने सलग दहा सामने जिंकून विजेतेपद पटकावले. महिला सॉफ्टबॉलच्या इतिहासात विद्यापीठाला प्रथमच सुवर्णपदक मिळाले आहे. संघ प्रशिक्षक म्हणून प्रा. विनायक जाधव, संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. राम पवार यांनी काम पाहिले. संघाच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

0 8 AUG 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूगोल अधिविभाग वास्तूचे विद्यार्थिनींच्या हस्ते उद्घाटन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे उद्घाटन करताना विद्यार्थिनी. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह मान्यवर.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थिनींच्या हस्ते करण्यात आले.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते कोनशिला अनावरण नियोजित होते. तथापि, जिओइन्फॉर्मेटिक्स विषयाच्या सायली यादव आणि निकिता जाधव या विद्यार्थिनींना बोलावून कुलगुरूंनी त्यांच्या हस्ते कोनशिला अनावरण केले. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी इमारतीमध्ये फीत सोडवून प्रवेश केला.

यावेळी सिव्हिल कंत्राटदार उदय घोरपडे, अनिरुद्ध घोरपडे आणि विद्युत ठेकेदार श्रीकांत गुजर यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. मीना पोतदार, डॉ. विद्या चौगुले, डॉ. प्रशांत पाटील, विद्युत अभियंता अमित कांबळे, विजय पोवार, शिवकुमार ध्याडे, वैभव आरडेकर, जी. बी. मस्ती आदी उपस्थित होते.

## अर्जुनवाडमध्ये १५ ऑगस्टपासून उपोषण

**अर्जुनवाड :** येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश झांबरे यांनी १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामपंचायत प्रशासनास दिला आहे. दि. १ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीत कोणती विकासकामे मंजूर झाली, त्यांना लागणारा फंड आणि खर्च झालेली रक्कम यांचा पूर्ण तपशील ग्रामपंचायत कार्यालयाने द्यावा, यासाठी १५ जुलै, २०२५ रोजी अर्ज केला होता; मात्र या अर्जाची ७ ऑगस्टपर्यंत ग्रामपंचायतीने दखल घेतली नाही. दि. ११ ऑगस्टपर्यंत दाखल केलेल्या अर्जाचा विचार न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

08 AUG 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘अण्णाभाऊ’ समाजशास्त्र समजलेले साहित्यिक

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे प्रतिपादन : विद्यापीठात परिसंवादाचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्राचे समाजशास्त्र हे देशातील अन्य राज्यांपेक्षा खूप वेगळे आहे. ते खऱ्या अर्थाने समजलेले साहित्यिक म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने आयोजित परिसंवादात ते बोलत होते. ‘अण्णाभाऊ साठे आणि मानवतावाद’ हा परिसंवादाचा विषय होता. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. गवस म्हणाले, समाजशास्त्राचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यामध्ये जागोजागी उमटलेले दिसते. त्यातून त्यांच्या आस्थेचा परीघ विस्तारलेला होता. शोषित वर्गाकडे नायक म्हणून पाहण्याची त्यांची दृष्टी त्यातूनच विकसित झाली होती. एका अर्थाने अण्णाभाऊ हे सांगणारे नव्हे, तर रचणारे लेखक होते. त्यांच्या साहित्यकृती मिथकांचे पुनरावलोकन करणाऱ्या आहेत. केवळ आत्मकथनात्मक न लिहीता रचनात्मक लेखनावर त्यांनी भर दिला. अभ्यासक, संशोधकांनी सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून अण्णाभाऊंच्या साहित्याचे नव्याने मांडणी करावी.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित परिसंवादात बीजभाषण करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस. सोबत डॉ. प्रभंजन माने, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे, सचिन साठे, डॉ. अक्षय सरवदे.**

अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे म्हणाले, अण्णाभाऊंना काल्पनिकता कधीच भावली नाही. वास्तविकता आणि प्रामाणिकता हे त्यांच्या समग्र साहित्याचे वैशिष्ट्य आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, अण्णाभाऊ यांच्या साहित्यामधील मानवतावादी सूत्रे ही प्रेरक स्वरुपाची आहेत.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांची चरित्रपुस्तिका अध्यासनामार्फत तयार करण्यात यावी. त्यांच्या साहित्यावर निर्माण झालेल्या चित्रपटांचे संकलनाचे कामही हाती घ्यावे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तरुण भारत



कोल्हापूर : कालवा निरीक्षक ऐश्वर्या बल्लाळ यांचा सत्कार करताना डॉ. मेघा गुळवणी. सोबत डॉ. कृष्णा पाटील, डॉ. मच्छिंद्र गोफणे, व्ही. बी. शिंदे, दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. मुफिद मुजावर, डॉ. नितीन रणदिवे आदी.

# कालवा निरीक्षकपदी निवडीबद्दल ऐश्वर्या बल्लाळचा सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ अंतर्गत शहाजी महाविद्यालयाच्या अभ्यास केंद्रातील ऐश्वर्या बल्लाळ यांची पाटबंधारे विभागात कालवा निरीक्षकपदी पदावर नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. ऐश्वर्या बल्लाळ यांनी एम.ए. (इतिहास) पदव्युत्तर शिक्षण दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून पूर्ण केले आहे. सध्या त्या शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात डॉ. अवनीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली '१८८५ ते १९८४ पर्यंतचा संविधानात्मक विकास आणि महिला" या विषयावर पीएच.डी. संशोधन करत आहेत. ऐश्वर्या बल्लाळ यांनी सत्काराला उत्तर देताना मनोगत व्यक्त केले. यावेळी केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर, सहायक प्राध्यापक डॉ. मुफिद मुजावर, डॉ. नितीन रणदिवे, डॉ. सुशांत माने, विशाल हिलगे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# पीएच.डी. प्रवेशासाठी अर्ज करण्यास २५ ऑगस्टपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विविध विषयांच्या पीएच. डी.च्या जवळपास ६५० जागा रिक्त झाल्या आहेत. या जागांसाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने प्रवेश अर्ज मागवले आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी २५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन परिपत्रकाव्दारे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे. शिवाजी विद्यापीठात अंतर्गत अनेक विषयांच्या पीएच. डी. च्या जागा रिक्त आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना www.unishivaji.ac.in या संकेतस्थळ अंतर्गत Ph.D.Admission २०२५-२६ या लिंकला भेट द्यावयाची आहे. अर्ज भरल्यानंतर परीक्षेचे वेळापत्रक व हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येणार आहेत.